प्रेस नोट दि. ०१/०४/२०२०

# सोलापूर ग्रामीण पोलीस दल

## विनाकारण प्रवास करणारी वाहने ताब्यात घेतलेबाबत

oooooo

यात निवेदन असे की, कोरोना या संसर्गजन्य विषाणूंचा प्रार्दुभाव कमी करण्यासाठी/रोखण्यासाठी प्रशासनाकडून संचारबंदी लागू करण्यात आलेली आहे.या संचारबंदी दरम्यान सर्व खाजगी/सार्वजनिक वाहतुक व्यवस्था बंद करण्यात आलेली आहे. तरी देखील नागरिक काही कामानिमित्त तसेच जीवनावश्यक वस्तू खरेदी करावयाची आहे अशी विविध कारणे सांगून विनाकारण बाहेर पडत आहेत, त्यामुळे संचारबंदीचे उल्लघंन होत आहे. त्यामुळे मा. पोलीस अधीक्षक सो यांनी अत्यावश्यक सेवेची वाहने तसेच काही महत्त्वाच्या कामानिमित्त प्रशासनाकडून देण्यात आलेल्या पासेस या व्यतिरिक्त विना कारण प्रवास करणा-या वाहनचालकांची वाहने एका निश्चित कालावधीपर्यत ताब्यात घेण्याचे आदेश दिलेले होते.

त्याप्रमाणे कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० नियम- ११ अन्वये साथीचे रोग प्रतिबंधक कायदा आणि फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४४ अन्वये रोगाचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी आवश्यक असतील त्या उपाययोजना करण्याचे अधिकार असल्याने सोलापूर ग्रामीण जिल्हयाच्या २५ पोलीस ठाणे यांनी खालील नमुद तक्त्याप्रमाणे वाहणे ताब्यात घेतलेली आहेत.

| अक्र | दिनांक | ताब्यात घेतलेल्या दुचाकी वाहनांची संख्या | ताब्यात घेतलेल्या चार चाकी वाहनांची संख्या | एकुण वाहनांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २९/०३/२०२० | २२ | ०० | २२ |
| २ | ३०/०३/२०२० | ५२८ | ०४ | ५३२ |
| ३ | ३१/०३/२०२० | ६६२ | ०७ | ६६९ |
| | एकूण | १२१२ | ११ | १२२३ |

यापुढेही अशाच प्रकारची कारवाई व्यापक प्रमाणात करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी भारत सरकार तसेच महाराष्ट्र शासनाने कोरोना या संसर्गजन्य विषाणूंचा प्रार्दुभाव कमी करण्यासाठी लावण्यात आलेल्या संचारबंदीचे पालन करून विनाकारण बाहेर न पडता सोलापूर ग्रामीण पोलीस सहकार्य करावे असे जाहिर आवाहन करण्यात येत आहे.

(मनोज पाटील )
पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण

प्रती,

मा.संपादक ..........

तरी सदर बातमी आपले लोकप्रिय दैनिक वर्तमान पत्रातून प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत:- जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर

Scanned with CamScanner